

रयत शिक्षण संस्थेचे,

# राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर.



मराठी विभाग २०२४-२५

## मराठी भाषा गौरव दिन

### सूचना

**दि.२५ फेब्रुवारी २०२५**

महाविद्यालयातील सर्व विभागातील विद्यार्थी, प्राध्यापक व कार्यालयीन सेवकांना सूचित करण्यात येते की, गुरुवार दि.२७ फेब्रुवारी रोजी कविवर्य कुसुमाग्रज उर्फ विष्णू वामन शिरवाडकर यांची जयंती आहे. कुसुमाग्रजांची जयंती सर्वत्र 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून साजरी करण्यात येते. याच मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयाचा मराठी विभाग, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई व दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय ऑनलाईन प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. सदर स्पर्धेचे उद्घाटन गुरुवार दि.२७ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ठीक :-१०:०० वा. महाविद्यालयाचे सन्मानीय प्र.प्राचार्य प्रो.डॉ.डी.आर.भोसले यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. तरी सर्वांनी सदर स्पर्धेत सहभागी व्हावे. स्पर्धेची लिंक उद्घाटनानंतर प्रसारित करण्यात येईल. स्पर्धेमध्ये ४० टक्के गुण प्राप्त करणाऱ्या सर्व स्पर्धकांना ऑनलाईन प्रमाणपत्र मिळेल. याची सर्वांनी नोंद घ्यावी.

प्रा.ए.बी.घुले
प्रमुख, मराठी विभाग

राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज कोल्हापूर

प्र. प्राचार्य
राजर्षी छ. शाहू कॉलेज,
कोल्हापूर